"वैशिष्ट्यपूर्ण (ले.शि. ४२१७ ०६०३) योजनेंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात मंजूर केलेला रु. ५.०० कोटी निधी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात वैशिष्ट्यपूर्ण (२२१७ १३०१) योजनेंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.

सन २०२३-२४ साठी लेखाशिर्ष (२२१७ १३०१) अंतर्गत
बाभूळगांव नगरपरिषद जि. यवतमाळ करिता
रक्कम रु. ५.०० कोटी

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- नपावै-२०२३/प्र.क्र.१८४(९)/नवि-१६**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- ३१ मे, २०२३**

**संदर्भ :-**

(१) शासन निर्णय नगर विकास विभाग, क्र. धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६,दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७
(२) शासन निर्णय नगर विकास विभाग, क्र. धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दिनांक ३० सप्टेंबर, २०२०
(३) शासन निर्णय नगर विकास विभाग नपावै-२०२३/प्र.क्र.१८४(९)/नवि-१६,दिनांक १४ मार्च,२०२३
(४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक १२ एप्रिल, २०२३

**प्रस्तावना :-**

राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वे संदर्भाधीन क्रमांक (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. संदर्भांधीन क्रमांक (३) येथील शासन निर्णयान्वये बाभूळगांव नगरपरिषद जि. यवतमाळ करिता वैशिष्ट्यपूर्ण (ले.शि. ४२१७ ०६०३) योजनेंतर्गत मंजूर केलेला रु.५.०० कोटी एवढा निधी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात वितरीत केलेला नसल्याने सदर निधी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील तरतुदींतून वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान" या योजने अंतर्गत **बाभूळगांव नगरपरिषद जि. यवतमाळ करिता संदर्भांधीन क्रमांक (३) येथील शासन निर्णयान्वये मंजूर केलेली रक्कम रु.५,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. पाच कोटी मात्र)** इतका निधी वितरीत करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ करीता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

३. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना नियंत्रक अधिकारी तसेच, जिल्हा प्रशासन अधिकारी, यवतमाळ

यांना यापुढे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, यवतमाळ / जिल्हा प्रशासन अधिकारी, यवतमाळ यांनी सदरचा निधी कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

४. सदरचे अनुदान दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

५. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ करिता वितरीत कलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

६. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ तसेच, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-१११८/प्र.क्र.३०/न.वि.-०४, दिनांक १२ मार्च,२०१८, दिनांक ४ जून, २०१८, दिनांक ९ ऑगस्ट,२०१८, दिनांक १५ डिसेंबर, २०१८, दि.०१ जून, २०१९,दि.२६ फेब्रुवारी,२०२०, दि.११ जुन,२०२०,दि.२१ मे,२०२१, दि.२८ मार्च,२०२२ व दिनांक २८ एप्रिल, २०२३ अन्वये कार्यवाही करावी.

७. यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगर विकास, ८०, सर्वसाधारण,१९२, नगर परिषदांना सहाय्य,(००) (४२) नगर परिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान (वेतनेतर) (कार्यक्रम), (२२१७ १३०१ ), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर), या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/ अर्थ-३, दि. १२ एप्रिल, २०२३ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे.सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अ.क्र.९ मधील तपासणीसुचीतील अ.क्र.१ ते १० मधील लागू असलेल्या अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे.

९. संदर्भाधीन क्र. (१) (२) (३) व (४) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श्रीकांत आंडगे)
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयाचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई

२. विभागीय आयुक्त, अमरावती

३. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,बेलापूर भवन ७ वा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४.

४. जिल्हाधिकारी, यवतमाळ

५. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई

६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर

७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

८. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई

९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

१०. सहायक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,नवी मुंबई - ४०० ६१४

११. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ

१२. जिल्हा प्रशासन अधिकारी, यवतमाळ

१३. मुख्याधिकारी, उमरखेड नगरपरिषद जि. यवतमाळ

१४. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई

१५. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.